## निशाणी क्र.४९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.४ यांनी 'कैफीयत नाही' चा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र.४ यांना जबाब देण्याकामी काही महत्वाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे ते मा. न्यायालयात मुदतीत आपला लेखी जबाब व म्हणणे दाखल करू शकले नाही. त्यामूळे त्यांच्या विरूध्द कैफीयत नाहीचा आदेश पारित झालेला आहे. करिता, त्यांच्या विरुध्द पारीत करण्यात आलेला 'कैफीयत नाही' चा आदेश रद्द करण्याविषयी त्यांनी विनंती केली आहे.

०३. वादी यांनी सदरील अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून असे कथन केले की, प्रतिवादी यांनी त्यांचा जबाब मुदतीत दाखल न करण्याचे कोणतेही कायदेशीर कारण नमुद केले नाही. त्यामुळे सदरील अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तुतचा अर्ज त्यावरील शपथपत्र व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झाल्यापासून किमान ९० दिवसांचे आत कैफीयत देणे आवश्यक होते. परंतु, कैफियत दाखल करणेसाठी विलंब झाल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादी यांनी अर्जामध्ये कैफियत देणेस उशीर झालेचे कथन केले आहे. सबब, अर्जात नमुद कारण हे संयुक्तिक दिसून येत नाही. परंतु, प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर चालविण्याकरीता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. प्रस्तुतची कैफियत विलंब माफ करुन अभिलेखावर घेतलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, विलंब माफ करुन कैफियत अभिलेखावर न घेतलेस

प्रतिवादी यांचे नुकसान होवू शकते. सबब, सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचीत होईल. यास्तव पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

०१. प्रतिवादी क्र.४ यांचे विरुध्द झालेला दावा विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र.४ यांनी सदर अर्जाचा खर्च प्रत्येकी रक्कम रूपये ४००/– (चारशे रूपये) वादी यांना द्यावा.

स्वाक्षरित/–

दिनांकः ०५.०८.२०२४. (श्रीमती आर. व्ही. पाटील)
भोकरदन. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे
न्यायालयाचे नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ०५.०८.२०२४.

स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही